# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **13/11/2022**

**Brief of the work done :-**

तूर चोरीतील आरोपींना अटक ; 8.62 लाखांचा मुद्देमाल जप्त.

# तुर चोरी प्रकरणातील तीन आरोपी जेरबंद

**■ ८.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**■ धान्य चोरी प्रकरणातील अन्य गुन्हे उघडकीस येणार**

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ पोहा रोडवरील धान्य गोडाऊनमधुन चोरीस गेलेल्या तुरीचा शेतमाल तसेच या प्रकरणातील तीन आरोपींना जेरबंद करुन ८.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यास स्थानिक गुन्हे शाखे वाशिमला यश आल्याची माहिती पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी दिली.

या संदर्भात पोलिस विभागाकडुन मिळालेल्या माहितीनुसार पोलीस स्टेशन कारंजा शहर हद्दीतील पोहा रोडवरील धान्य गोडाऊनमधून शेतकऱ्यांनी ठेवलेला तुरीचा शेतमाल चोरी झाल्याची तक्रार पो.स्टे.कारंजा शहर येथे करण्यात आली होती. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सदर चोरट्यांच्या मागावर होते. त्यावरून सैय्यद शहादत सैय्यद मुझफ्फर, वय ३० वर्षे,रा.आठवडी बाजार, आतारपुरा, दारव्हा, जिल्हा- यवतमाळ यास त्याच्या इतर ३ साथीदारांसह ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरी केलेला शेतमाल तुरीचे १३५ पोते ज्याची अंदाजे किंमत ५.६० लाख रुपये, चोरीसाठी वापरलेला ॲपे ऑटो ज्याची अंदाजे किंमत २.५० लाख रुपये, २ मोबाईल फोन ज्याची अंदाजे किंमत १२ हजार रुपये व रोख रक्कम ४० हजार रुपये असा एकूण ८.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सन - २०२२ मध्ये शेतमाल चोरी संदर्भात १० गुन्ह्यांमध्ये एकूण २६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून एकूण ३८.२५ लाखांचा शेतमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात शेतमालाच्या झालेल्या अन्य चोऱ्यादेखील उघडकीस येतील असे पोलिस विभागाला वाटते. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे चोरटयांमध्ये दहशत पसरली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.सोमनाथ जाधव, स्था.गु.शा., वाशिम यांचे पथक सपोनि.विजय जाधव, पोहवा.गजानन अवगळे, नापोकॉ.मुकेश भगत, राम नागुलकर, गजानन गोटे, पोकॉ.शुभम चौधरी, तहेमीना शेख, चापोकॉ.किशोर सूर्यवंशी व निलेश मिसाळ यांनी पार पाडली. (जि.प्र. )

**शेतमाल चोरी केल्याची दिली कबुली**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ११ नोव्हेंबर रोजी तुर चोरी प्रकरणातील आरोपींना कारंजा हद्दीतून ताब्यात घेऊन त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी पोहा रोडवरील धान्य गोडाऊनमधून तुरीचा शेतमाल चोरी केल्याचे कबुल केले.